# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक ३१३-२२** **दिनांक १७/१०/२०२२**

## कॉपर चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतास अटक करण्यात पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २९/०९/२०२२ रोजी रात्रौ २३:००वा. पासुन ते दिनांक ३०/०९/२०२२ रोजी सकाळी ०७.०० वा. च्या सुमारास गाळा नं.१७, सिताराम यादव चाळ, मंगाओ मार्टचे समोर, गौराईपाडा नाका, नालासोपारा पूर्व, ता. वसई येथील फिर्यादी यांचे गाळयाचे अर्धवट उघडया शटरद्वारे कोणीतरी अज्ञात आरोपीताने गाळयामध्ये प्रवेश करुन गाळयातील २०० कि.ग्रॅ. वजनाचे कॉपर लग्ज असा एकुण-७६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करुन नेला होता. सदरबाबत फिर्यादी- श्री.जावेद रफिक खान, वय-३५ वर्षे, व्यवसाय- वेल्डर रा.सिताराम यादव चाळ, मंगाओ मार्टचे समोर, गौराईपाडा नाका, नालासोपारा पूर्व, ता. वसई यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ८२६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३८० प्रमाणे दिनांक ०१/१०/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपीतांचा कसोशिने शोध घेवुन सापळा रचुन सराईत आरोपीत नामे. अंकित सिंग ऊर्फ लंगडा, वय-२६ वर्षे, रा. गवराईपाडा, नालासोपारा पुर्व, ता. वसई यास ताब्यात घेवुन त्यास नमुद गुन्हयात दिनांक १३/१०/२०२२ रोजी अटक केली आहे. नमुद आरोपीताकडून पोलीस कोठडी दरम्यान गुन्हयात चोरी केलेला एकुण- ७६,०००/- रु.किं.चे २०० कि.ग्रॅ. वजनाचे कॉपर लग्ज असा १०० टक्के मुद्देमाल जप्त करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस स्टेशनचे श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, तसेच पोहवा/नामदेव ढोणे, नेम. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---ooo---